**स. क्रि.केस नं. १६३/२०२२**
श्री. वारणा विभाग सह ग्राहक मंडळ वि. सचिन सर्जेराव चौगुले
**नि. १६/क/लगत**

**उलटतपास आरोपीतर्फे साक्षीदार क्र. १ यांचा वकील श्री. एस.पी.लोखंडे यांचेतर्फे पुन्हा सुरु,**

१५. साखर पोहोच करण्याकरिता आमच्याकडे बरीच वाहने आहेत. आरोपीला साखर कोणत्या वाहनाने पोहोच केली ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, एखादया व्यक्तीला माल पोहोचविल्यानंतर त्याबाबतची नोंद आमच्याकडील डायरीला घेतली जाते. हे म्हणणे खरे नाही की, तशी नोंद केल्यानंतर त्याबाबतची पावती पोहोच झालेल्या व्यक्तीला दिली जाते. प्रस्तुत आरोपीला माल पोहोचविल्याबाबत त्याची चलनावर आम्ही सही घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, ते चलन या कामात जोडलेले नाही. ते चलन या कामी जोडायला आम्हाला कोणतीही अडचण नव्हती. प्रस्तुत कामी ज्या शाखेतून माल पाठविला होता त्या शाखेचे चलन होते तसेच मुख्य शाखेचे देखील चलन होते. हे म्हणणे खरे आहे की, अशा प्रकारच्या सर्व चलनांची एकत्रित साठवणूक आमच्या मुख्य शाखेकडे केली जाते. हे म्हणणे खरे आहे की, ज्या चलनाद्वारे आरोपीला माल पोहोचविला त्या चलनांबाबतचे वर्णन माझी नोटीस, फिर्याद व सरतपास यामध्ये नमूद नाही.

१६. हे म्हणणे खरे आहे की, ज्या संगणकामध्ये मालासंबंधी नोंदी ठेवल्या जातात तो संगणक मी वापरत नाही. तो संगणक अकॉऊंट शाखा यांच्या अखत्यारित असतो. प्रस्तुत नोंदीबाबत बॅलन्सशीट त्या शाखेकडून आमच्याकडे प्रिंट करून पाठविली जाते. हे म्हणणे खरे आहे की, अशा बाबतच्या नोंदी अकॉऊंट सेक्शन करत असते. आमच्या चीफ अकॉऊंट यांचे नाव संदीप महिपती पाटील असे आहे. प्रस्तुत कामात खाते उतारा हजर करणेबाबत आमच्या संस्थेने ठराव पारीत केलेला आहे. प्रस्तुत ठरावामध्ये "खाते

उतारा हजर करणे” असे शब्द नमूद नाहीत. सदर आरोपीस आम्ही नोटीस नोव्हेंबर २०२२ मध्ये पाठविली होती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी यास पैसे मागणी नोटीस मागणेकरिता संस्थेने मला ठराव करून दिला होता.

१७. प्रस्तुत आरोपीस नोव्हेंबर २०२२ पूर्वी आमच्या संस्थेतर्फे अन्य नोटीस पाठविली होती किंवा कसे याबाबत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी वैयक्तिकरित्या आरोपीस पैसे मागणी नोटीस पाठविली नव्हती. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, सदरची नोटीस आरोपीस आमच्या संस्थेने पाठविली होती. हे म्हणणे खरे आहे की, नोव्हेंबर २०२२ मध्ये पाठविण्यात आलेली रक्कम मागणी नोटीस या कामी हजर करण्यात आलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, संस्थेमार्फत मी आरोपीस रक्कम मागणी नोटीस पाठविली होती. त्याची तारीख मला आठवत नाही. प्रस्तुत कामात हजर करण्यात आलेला ठराव हा नोटीस पाठविण्यात आल्यानंतर झालेला होता. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत कामात ठराव झाल्यानंतर त्यामधील अधिकार मला प्राप्त झाले.
प्रश्न – ठराव होणेपूर्वी पाठविण्यात आलेल्या रक्कम मागणी नोटीसीबाबत तुम्हाला अधिकार प्राप्त झाले नव्हते ?
उत्तर – ती नोटीस मी वसुली अधिकारी या नात्याने मी पाठविली होती.
१८. वसुली अधिकारी या नात्याने नोटीस पाठविण्याचे अधिकार मला संस्थेने दिलेले आहेत. प्रस्तुत संस्थेमध्ये मला तसे अधिकार नेमणुकीद्वारे दिलेले आहेत. तसे नेमणुकीचे माझे पत्र मी या कामी हजर केलेले नाही.

१९. नि. २४ वरील नोटीसीवर दि. ०१.०४.२०२२ ही आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, त्यावर तारीख ११.०४.२०२२ अशी दिसून येत आहे. (प्रस्तुत स्पष्टीकरणास आरोपी तर्फे वकील यांनी हरकत घेतली की, मी साक्षीदाराकडे नि. २४ वरील नोटीस पाहण्याकरिता दिलेली होती, तेव्हा त्यांनी तारीख ०१.०४.२०२२ अशी सांगितलेली होती. त्यामुळे सदरचे स्पष्टीकरण अभिलेखावर घेण्यात येवू नये.

फिर्यादीतर्फे वकील यांनी याबाबत युक्तीवाद केला की, सदर साक्षीदारास दृष्टीदोष असल्यामुळे सदर तारीख त्यांना लक्षात आलेली नाही मात्र काळजीपूर्वक बघितल्यानंतर त्यांनी त्याबाबतचे स्पष्टीकरण दिलेले आहे. सदर स्पष्टीकरणाबाबतचा निर्णय हा अंतिम युक्तीवादाच्या वेळी घेण्यात येईल.)

प्रश्न – सदर कामात हजर करण्यात आलेली नोटीस पाठविण्याकरिता तुम्हाला ठरावानुसार अधिकार देण्यात आलेले नाहीत ?

उत्तर – सदर ठरावानुसार कोर्ट कामाकरिता मला अधिकार देण्यात आलेले आहेत.

२०. हे म्हणणे खरे आहे की, नि. २४ वर पाठविणाऱ्या व्यक्तीचे नाव माझेच आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत कामात संस्थेमार्फत पाठविण्यात आलेली नोटीस हजर करण्यात आलेली नाही. तशी नोटीस संस्थेने आरोपीला दिली होती किंवा कसे याबाबत मला आठवत नाही. प्रस्तुत नोटीस पाठविल्यानंतर आम्हाला त्याची पोस्टाची पोहोच प्राप्त झालेली होती. सदर नोटीस कोणत्या व्यक्तीने घेतली होती याबाबत मला सांगता येणार नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, पोस्टाद्वारे आम्हाला ती प्राप्त झाल्यामुळे तसे सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी यास मी अथवा आमच्या संस्थेमार्फत देण्यात आलेली कोणतीही नोटीस पोहोचलेली नाही. प्रस्तुत कामी कागदपत्रे हजर करण्याबाबत जसा ठराव मला देण्यात आलेला आहे तसा ठराव अन्य कोणालाही देण्यात आलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत कामातील कागदपत्रे वकिलांच्या द्वारे मी हजर केलेली आहेत.

२१. प्रस्तुत धनादेश कोणत्या तारखेला भरला ती तारीख मला आठवत नाही. प्रस्तुत धनादेश दि. ०१.०४.२०२२ या तारखेचा आहे. प्रस्तुत धनादेश आमच्या अकॉऊंट सेक्शनमधील व्यक्तीने भरला होता. तो धनादेश कोणत्या बँकेत भरणा केला होता ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत कामी वकिलांमार्फत कागद हजर करणेपूर्वी मी ते नीट वाचलेले होते. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०१.०४.२०२२

चा धनादेश या कामी हजर केलेला नाही.हे म्हणणे खरे आहे की, मी दाखल केलेली प्रस्तुत फिर्यादी ही दि. ०१.०४.२०२२ च्या धनादेशाबाबतची नाही. सदरचा धनादेश हा Account Payee अशा स्वरुपाचा आहे. सदर धनादेश देते वेळीच तो धनादेश कोणास देण्यात आलेला होता त्याबाबतची नोंद आहे. प्रस्तुत धनादेशावर आम्ही आरोपीचा समोर शिक्का मारून तो घेतला होता. प्रस्तुत धनादेश आम्ही आरोपीच्या गावात जावून घेतला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या फिर्याद, नोटीस व सरतपास मध्ये आरोपीच्या समक्ष शिक्का मारण्यात आलेला होता असे शब्द नमूद नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, असा मजकूर फिर्याद, नोटीस व सरतपास मध्ये नमूद करायला मला अडचण नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत आरोपी समक्ष शिक्का मारून धनादेश घेतला असा मजकूर फिर्याद, नोटीस व सरतपास मध्ये का नमूद नाही हे मी माझ्या वकिलांना विचारले नव्हते.

२२. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत धनादेशावरील तारीख ही स्टॅम्प आहे. सदरची तारीख ही आरोपीच्या हस्ताक्षरात लिहून घेण्याची आम्हाला गरज वाटली नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत आरोपीने कोणत्याही देण्याकरिता संस्थेला अगर आम्हास कोणताही धनादेश कोणतेही देणे लागत नसल्यामुळे दिलेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, तशा प्रकारचा कोणताही रिटर्न मेमो आरोपीच्या बॅंकेने अथवा आमच्या बॅंकेने दिलेला नव्हता. माझ्या मते फिर्याद अंदाजे एप्रिल मध्ये दाखल केलेली होती. हे म्हणणे खरे नाही की, नोव्हेंबर २०२२ च्या पाठविण्यात आलेल्या नोटीसीबाबत प्रस्तुतची फिर्याद नाही. कोरोना काळात आरोपीला सूट दिलेली होती त्याबाबतचा पत्रव्यवहार हा कार्यालय बंद असल्यामुळे झालेला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, संबंधित सूट देण्याबाबत आम्ही संबंधित शाखाधिकारी यांना कळविले होते व त्यांनी आरोपीला कळविले होते. हे म्हणणे खरे आहे की, कोरोना काळात आमच्या शाखा सुरु होत्या. प्रस्तुत आरोपीस सूट देण्याबाबत कोणत्या शाखाधिकाऱ्याला सांगितले होते त्याचे नाव मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, एखादया व्यक्तीस सूट देण्यापूर्वी तशा

पद्धतीचा कागद घेतला होता.

२३. प्रस्तुत काळात कोरोना असल्यामुळे संबंधित शाखाधिकारी हा आरोपी पर्यंत पोहोचलेला होता किंवा कसे याबाबत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी दाखल केलेल्या फिर्याद, नोटीस व सरतपास यामध्ये "कोरोना काळ असल्यामुळे व धंदयामध्ये मंदी असल्यामुळे सदरची येणे रक्कम आरोपीने "आज देतो उदया देतो" असे सांगून फिर्यादी संस्थेकडून साखर उधारीवर घेतच होता" असा मजकूर नमूद आहे. हे म्हणणे खरे आहे की, कोरोना काळात आरोपीकडे संपर्क झाला होता किंवा कसे याबाबत फिर्याद, नोटीस व सरतपासामध्ये मजकूर नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, तसा मजकूर का नमूद नाही हे मी माझ्या वकिलांना विचारले नव्हते. ज्या शाखेकडून साखरेबाबतचे कागद हे देण्यात आलेले होते ते कागद हजर करण्यास मी तयार आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर आरोपीस वसुली अधिकारी म्हणून नोटीस पाठविल्याबाबतची नोंद ही आमच्या संस्थेच्या मिनीटस मध्ये आहे. सदर ठरावाबाबत बोर्ड मिटींग झाली होती. तसा कागद मी या कामी हजर करण्यास तयार आहे.

**उलटतपास वकिलांच्या विनंतीवरुन पुढील तारखेपर्यंत तहकूब**

**सही/-**
**(के.दि.काकतकर)**
दिनांक. ११.०७.२०२५ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पन्हाळा